# पुन्हा....

भेटण्याचे-बोलण्याचे,
स्वप्नं वेडे उराशी...
भेटलो, बोललो..
मनःशांती - जराशी !

दिले काय...?
अन घेतलेही नाही...
पण वेगळे समाधान,
क्षणांत भरून राही !

घड्याळाचा काटा,
पाहुनी आवरावे...
तरी पुढील भेटीचे,
वादे करावे !

पुन्हा भेटण्याचे,
स्वप्नं सुरु व्हावे...
पुन्हा वेड्या मना,
जरा झुरू द्यावे...

पुन्हा बोलण्याची,
ओढ ती अनावर...
पुन्हा असू दोघे,
एकमेकांसमोर !!!

-प्रीती.